**उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी/इंग्रजी) परीक्षा-२०२२ च्या प्रतिक्षायादी क्र.२ मधून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांपैकी विहित मुदतीत रूजू न झालेल्या उमेदवारांचे नियतवाटप रद्द करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन

**सामान्य प्रशासन विभाग**

**क्रमांकः एएससी १५२४/प्र.क्र.१७५ /प्रशा-३,**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २८ एप्रिल, २०२६

वाचा:- **१) म.लो.आ. चे पत्र क्र. जीडीआर-२४२२/प्र.क्र.४२/२०२२/२९, दि. ०६.११.२०२५.**

**२) म.लो.आ. चे पत्र क्र. जीडीआर-२४२२/प्र.क्र.७९/२०२२/२९, दि. २०.०१.२०२६.**

**३) या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक- १६.०२.२०२६ चे ज्ञापन.**

**४) सा.प्र.वि., शासन परिपत्रक क्र. मलोआ १११९/प्र.क्र.११५/८, दि.०२.०८.२०१९.**

शासन आदेश :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधिन क्रमांक १ व २ येथील पत्रान्वये उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी/इंग्रजी) परीक्षा-२०२२ च्या प्रतिक्षायादी क्र.२ मधून उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी/इंग्रजी) या पदावर नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या मराठी- ०२ व इंग्रजी -०९ उमेदवारांचे संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक १६.०२.२०२६ च्या ज्ञापनान्वये मंत्रालयीन विभागात/बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयात "उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी/इंग्रजी)" या पदावर नियतवाटप करण्यात आले होते. **सदर ज्ञापनान्वये उमेदवारांना नियुक्तीचा स्विकार करण्यासाठी दि. १८.०३.२०२६ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती.**

२. संदर्भाधीन क्र. ४ येथील दि. ०२.०८.२०१९ च्या शासन परिपत्रकानुसार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या ३० दिवसाच्या मुदतीत उमेदवार रूजू न झाल्यास किंवा विहित कालावधीत रूजू होण्यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती न केल्यास किंवा विहित वाढीव कालावधीत उमेदवार रूजू न झाल्यास नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधित उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्याचे आदेश निर्गमित करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

३. दि. १६.०२.२०२६ च्या ज्ञापनान्वये नियवाटप करण्यात आलेल्या उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी) -०२ उमेदवारांपैकी ०१ उमेदवाराने तसेच उच्चश्रेणी लघुलेखक(इंग्रजी) -०९ उमेदवारांपैकी ०४ उमेदवारांनी विहित कालावधीत नियुक्ती स्विकारली नाही.

४. सबब, संदर्भाधिन क्र. ४ येथील शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार संदर्भाधिन क्र. ३ येथील दि. १६.०२.२०२६ च्या ज्ञापनान्वये मंत्रालयीन विभागात/बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयात उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी/इंग्रजी) पदावर नियतवाटप करण्यात आलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत रूजू न झालेल्या सोबतच्या विवरणपत्र "अ" व “ब” मधील उमेदवारांचे नियतवाटप रद्द करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०४२८१६४२४४२३०७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

GAJANAN SAHADEO PARAB

Digitally signed by GAJANAN SAHADEO PARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT,
2.5.4.20=23BC53B7F4F1CA24AD7FDD55B639979816E6E784D75D5396D0F50367308ECC8B, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=6E3168FC30A0E07A9B8D13F2A24C658F97BA49C1AB3A023B1606696C22202DDD, cn=GAJANAN SAHADEO PARAB
Date: 2026.04.28 16:44:35 +05'30'

**( ग. स. परब )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति:- संबंधित उमेदवार (सोबतच्या विवरणपत्र "अ" व “ब”प्रमाणे) (ई मेल व्दारे)

प्रत :-

१) सह सचिव/उप सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग.
२) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
३) सामान्य प्रशासन विभाग [कार्यासन (प्रशा-३)] (संग्रहार्थ)

**उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी) परीक्षा-२०२२ च्या प्रतिक्षायादी क्र.२ मधून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांपैकी विहित मुदतीत रूजू न झालेल्या उमेदवारांचे नियतवाटप रद्द करण्याबाबत.**

**सामान्य प्रशासन विभाग, शासन ज्ञापन क्र. एएससी १५२४/प्र.क्र.१७५ /प्रशा-३,**

**दिनांक : २८ एप्रिल, २०२६ सोबतचे (विवरणपत्र "अ")**

| अ.क्र. | म.लो.आ. शिफारस क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | लिंग | शिफारस प्रवर्ग | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २ | SHIVEWAR NEETA RAJESHWAR | OBC | Female | OPEN-General-WT-१ | सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई |

## उच्चश्रेणी लघुलेखक (इंग्रजी) परीक्षा-२०२२ च्या प्रतिक्षायादी क्र.२ मधून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांपैकी विहित मुदतीत रूजू न झालेल्या उमेदवारांचे नियतवाटप रद्द करण्याबाबत.

### सामान्य प्रशासन विभाग, शासन ज्ञापन क्र. एएससी १५२४/प्र.क्र.१७५ /प्रशा-३, दिनांक : २८ एप्रिल, २०२६ सोबतचे (विवरणपत्र "ब")

| अ.क्र. | म.लो.आ. शिफारस क्रमांक | उमेदवाराचे नाव | लिंग | प्रवर्ग | शिफारस प्रवर्ग | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 1 | 2 | TANVI GAJANAN TALAWADEKAR | Female | Unreserved | OPEN-General-WT-1 | सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई |
| 2 | 4 | Rajshri Sineshrao Lokhande | Female | EWS | OPEN-Female-WT-1 | विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई |
| 3 | 5 | SAINDANE JAGDISH HARIBHAU | Male | OBC | OBC-General-WT-1 | औद्योगिक व कामगार न्यायालय, मुंबई |
| 4 | 9 | KALE ASHWINI BALU | Female | EWS | OPEN-Female-WT-2 | गृह विभाग, मंत्रालय, मुंबई |